# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक - १२०/२०२५ दिनांक १३/०३/२०२५

## प्रेसनोट

**अनाधिकृतरित्या मिरारोड परिसरात बनावट कागदपत्र तयार करुन वास्तव्यास असलेल्या एका बांगलादेशी महिला नागरिक व तिला सहारा देणाऱ्या ईसमावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-मिरा-भाईंदर पथकाची कारवाई.**

---

दिनांक १२/०३/२०२५ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, मिरा-भाईंदर यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अनधिकृतपणे वास्तव्य करणारे बांगलादेशी महिला व तिला सहारा देणारा इसम असे काशिमीरा पोलीस ठाण्याचे हद्दीतील डेल्टा म्हाडा बिल्डींगचे समोर, पाडुरंगवाडी, काशिमीरा या ठिकाणी येणार असल्याची माहिती मिळाली, मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दुभाषीक व दोन पंचासमक्ष वर नमुद ठिकाणी १७.१५ वा. सुमारास साफळा रचुन ०१ महिला बांगलादेशी नागरीक हिस महिला पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन तिचेकडे केलेल्या चौकशीत, ति स्वतः बांगलादेशी नागरीक असुन सुध्दा तिने खोट्या कागदपत्रांचे आधारे भारतीय आधारकार्ड, भारतीय निवडणुक आयोगाचे मतदान ओळखपत्र बनवुन त्याचा वापर केला तसेच आरोपीत क्रमांक ०२ यास नमुद महिला हि बांगलादेशी नागरीक असल्याचे माहित असतांना देखील तिला बेकायदेशीर वास्तव्यासाठी आश्रय दिलाने त्यांना ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत दोन पंचासमक्ष पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे यांनी सविस्तर पंचनामा केला आहे. ताब्यात घेतलेल्या महिला बांगलादेशी व तिस सहारा देणारा इसम यांच्या विरुध्द मपोहवा/निशिगंधा मांजरेकर यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्रमांक ११९/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८, ३३६ (२), ३४० (२) सह पासपोर्ट (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३, ४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७,१३,१४-अ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष मिरा-भाईंदर पथकाचे पोनि/देविदास हंडोरे, पोउपनिरी/प्रकाश तुपलोंढे, सफौ/उमेश पाटील, सफौ/अनिल पवार, सफौ/रामचंद्र पाटील, सफौ/राजाराम आसावले, सफौ/शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, पो.शि./केशव शिंदे, मपोहवा/निशीगंधा मांजरेकर, मपोशि/तृशा कटकधोंड व चापोहवा/सम्राट गावडे यांनी केली आहे.

-----------------oo--------------------